1/3

Maharashtra State
Board of Secondary & Higher Secondry Education
S.R. No. 832 A, Final Plot No. 178, 179
Bhamburda, Shivajinagar, Pune- 411 004

महाराष्ट्र राज्य
माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षणमंडळ,
सर्व्हे नंबर-८३२ अ,फायनलप्लॉटनं.१७८ व १७९
भांबुर्डा, शिवाजीनगर, पुणे-४११ ००४.

Phone No.:- 020- 25705000 E-mail:- secretary@msbshse.ac.in Fax No.:- 020-25665807

क्र. रा.मं./संशोधन/१३३६
पुणे-४११ ००४
दि.०५/०३/२०१९

प्रति,

विभागीय सचिव,
सर्व विभागीय मंडळे.

विषय:- दिव्यांग विद्यार्थ्यांच्या उत्तरपत्रिका तपासणी व सवलतींबाबत.

संदर्भ:- १) शासन निर्णय क्र. संकीर्ण-२०१७/(११८-१७)/एस.डी-६, दि.१६/१०/२०१८
२) मुंविमं/उ.मा.गो./३०९५, दि.१८/०२/२०१९ व
३) नाविमं/उ.मा.गो./मागो/३२५, दि.२२/०१/२०१९

महोदय/महोदया,

उपरोक्त विषयास अनुसरुन कळविण्यात येते की, दिव्यांग विद्यार्थ्यांच्या दिव्यांग प्रकारानुसार उत्तरपत्रिकांच्या मूल्यांकनाचे निकषांसंदर्भातील परिपत्रक या पत्रासोबत जोडलेले आहे. सदर परिपत्रक सर्व संबंधित शाळा त्यांचे मुख्याध्यापक, कनिष्ठ महाविद्यालय त्यांचे प्राचार्य, दिव्यांग विद्यार्थ्यांच्या उत्तरपत्रिकांचे मूल्यांकन करणारे परीक्षक, नियामक, मुख्य नियामक इत्यादी सर्व संबंधीतांच्या तात्काळ निदर्शनास आणून द्यावे.

सचिव,
राज्यमंडळ, पुणे-४.

---

क्र.कोविम/माध्य.गोप./3564
कोल्हापूर-४१६००४
दिनांक : ११/०३/२०१९

प्रति,
मुख्याध्यापक,
सर्व मान्यताप्राप्त माध्यमिक शाळा
सातारा/सांगली/कोल्हापूर

उपरोक्तप्रमाणे दिव्यांग विद्यार्थ्यांच्या उत्तरपत्रिका तपासणी व सवलती बाबतचे परिपत्रक आवश्यक कार्यवाहीस्तव.

विभागीय सचिव,
कोल्हापूर विभागीय मंडळ,कोल्हापूर.

२/३

# महाराष्ट्र राज्य, माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, भांबुर्डा, शिवाजीनगर, पुणे-४११ ००४.

---

माध्यमिक शालांत व उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षा

## दिव्यांग विद्यार्थ्यांच्या उत्तरपत्रिकांचे मूल्यमापन करण्याबाबतच्या सूचना:

वाचा: *विशेष गरजा असणा-या दिव्यांग विद्यार्थ्यांच्या अध्ययन शैलीनुसार मूल्यांकनाबाबत व शैक्षणिक सवलती संदर्भात मार्गदर्शक सूचना बाबतचा शासन निर्णय क्र. संकीर्ण-२०१७/(११८-१७)/एस.डी-६, दि.१६ ऑक्टोबर २०१८.*

माध्यमिक शालांत व उच्च माध्यमिक प्रमाणपत्र इ.१०वी व इ.१२ वी परीक्षेस प्रविष्ट होणाऱ्या दिव्यांग विद्यार्थ्यांच्या उत्तरपत्रिकांची तपासणी करताना फेब्रुवारी-मार्च २०१९ च्या परीक्षेपासून दिव्यांग प्रकार विचारात घेऊन खालील प्रमाणे कार्यपध्दती अवलंबिण्यात यावी.

१) अंशत: अंध /पूर्णत: अंध (Blind), (२) बहुविकलांग (Spastics), (३) अध्ययन अक्षमता(Learning Disabled), (४) सेरेब्रल पाल्सी(Cerebral Palcy),(५) अस्थिव्यंग (**Physically Handicap**)-(*लेखनिक दिला असल्यास*), (६) स्नायुंची विकृती (Muscular Dystrophy), (७)शारीरिक वाढ खुंटणे (Dwarfism).

अ) ज्या प्रश्नांमध्ये आकृतीसाठी उपप्रश्न विचारुन स्वतंत्रगुण दर्शविले असतील अशा ठिकाणी संबंधित प्रश्नांचे खालील प्रमाणे गुणदान करावे.

i) आकृती काढली असल्यास किंवा आकृती काढण्याचा प्रयत्न केला असल्यास आकृतीसाठीचे पूर्ण गुण देण्यात यावेत.

ii) आकृतीवर आधारित प्रश्नांचे उत्तर ज्याप्रमाणात लिहिले असेल त्यानुसारच गुणदान करण्यात यावे.

iii) गणित विषयातील परिगणनेमध्ये संख्येच्या उलट सुलट लिहिणे. (उदा.- १२ ऐवजी २१, ३१ ऐवजी १३ इत्यादी.) चिन्हांची अदलाबदल याकडे दुर्लक्ष करावे व विद्यार्थ्याने वापरलेल्या पध्दती व केलेली परिगणना अचूक आहे की नाही हे पाहून मूल्यांकन करावे.

iv) उत्तरप्रत्रिकेतील आकृत्या, नकाशे व आलेख तक्ते इ. काढण्याचा प्रयत्न केला असल्यास पूर्ण गुण देण्यात यावे.

८) कुष्ठरोगातून बरे झालेले निवारित विद्यार्थी (Leprosy Cured Persons), (९) ॲसिड ॲटॅक व्हिक्टीम (Acid attack Victim) (१०) इतर आजारांमुळे शालेय शिक्षणात येणा-या अडचणी. (एपिडरमोलिस बुलोसा (Epidermolysis Bullosa), HIV बाधित, पेडियाट्रिक

१

कॅन्सर, डायबेटीस मेलीटस टाईप (Diabetes mellitus type) सर्व्हायवर(Pediatric cancer survivors), कॅन्सर अफेक्टेड चिल्ड्रेन ऑन मेन्टेनन्स थेरेपी(Cancer afflicted children on maintenance therapy), चिल्ड्रेन विथ एपिलेप्सी (Children with epilepsy), चिल्ड्रेन विथ ए.डी.एच.डी.( Children with ADHD), चिल्ड्रेन विथ न्युरोलॉजीकल विल्सन डिसिज (Children with neurological Wilson disease))

i) सर्व विषयांसाठी वाक्यरचना, वर्णलेख(स्पेलिंग) चुकांकडे दुर्लक्ष करावे. उत्तरांमधील फक्त गाभा लक्षात घेउन मूल्यांकन करावे. व्याकरण, विरामचिन्हे या चुकांबाबत गुणदान कमी करु नये.

ii) ज्या प्रश्नांमध्ये फक्त आकृती काढावयाची असेल अशा प्रश्नांचे बाबतीत संबंधीत विषयांमध्ये प्रत्यक्षात संपादित केलेले गुण हे प्रश्नपत्रिकेच्या एकूण गुणांच्या प्रमाणात रुपांतरित करुन देण्यात यावेत. (आकृतीच्या प्रश्नांचे गुण वगळून)

उदा.- जर ६० गुणांची प्रश्नपत्रिका असेल व आकृतीसाठी स्वतंत्र प्रश्न विचारण्यात आला असेल व त्यासाठी १० गुण दर्शविले असतील तर अशावेळी विद्यार्थ्यांना ३० गुण संपादन केले तर खालील प्रमाणे रुपांतरित गुणवाढ देण्यात यावी.

६० गुण - १० गुण = ५० गुण

जर ५० गुणापैकी = ३० गुण

जर १० गुणापैकी = ०६ गुण

३० + ०६ = ३६ एकूण गुण.

११) अध्ययन अक्षम, (१२) स्वमग्न (ऑटिस्टीक), (१३) गतीमंद (Slow Learner)/मतीमंद (Intellectual Disability Borderline), (१४) थॅलेसेमिया (Thalassemia ), (१५) मल्टीपल स्केलरॉसिस (Multiple Sclerosis), (१६) मज्जासंस्थेचे तीव्र आजार (Chronic Neurological Conditions), (१७)मानसिक आजार (Mental Illness), (१८) हिमोफेलिया(Hemophilia) (१९)सिकलसेल (Sickle Cell Disease), (२०) पार्किनसन्स(Parkinson Disease).

i) सर्व विषयांसाठी वाक्यरचना, वर्णलेख(स्पेलिंग) चुकांकडे दुर्लक्ष करावे. उत्तरामधील फक्त गाभा लक्षात घेवून मूल्यांकन करावे.

२१) 'कर्ण बधिर' व (२२)'वाचा आणि भाषा अक्षमत्व' असलेले विद्यार्थी.

i) सर्व विषयांसाठी वाक्यरचना, वर्णलेख(स्पेलिंग), व्याकरण, विरामचिन्हे या चुकांबाबते गुणदान कमी करु नये. उत्तरामधील फक्त गाभा लक्षात घेवून मूल्यांकन करावे.

***

सचिव
महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ
भांबुर्डा, शिवाजीनगर,
पुणे-४११००४.